# ससूनचा नवजात शिशू अतिदक्षता विभाग पथदर्शी

## गिरीश महाजन : राज्यातील वैद्यकीय महाविद्यालयांत प्रकल्प राबविणार



**पुणे, दि. १६ (प्रतिनिधी)** - ससून सर्वोपचार रुग्णालयातील नवजात शिशू अतिदक्षता विभागाचा प्रकल्प पथदर्शी आहे. याप्रकारचे प्रकल्प राज्यातील सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात राबवले जावेत यासाठी अधिष्ठातांना सूचना देणार असल्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री गिरीश महाजन यांनी शनिवारी घोषित केले.

बी.जे.वैद्यकीय महाविद्यालय व ससून सर्वोपचार रुग्णालयातील ५९ खाटांची सुविधा असलेल्या नवजात शिशू अतिदक्षता विभागाचा लोकार्पण सोहळा राज्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री गिरीष महाजन व पुणे जिल्हयाचे पालकमंत्री गिरीश बापट यांच्या हस्ते झाले. यावेळी खा. अनिल शिरोळे, ससून रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. अजय चंदनवाले आदी उपस्थित होते. यावेळी गिरीश बापट म्हणाले, गरीब रुग्ण केंद्रबिंदु मानून ससूनमधील डॉक्टर्स रुग्ण सेवा देत आहेत. हा ससून पॅटर्न राज्यात सर्वत्र राबवला जावा अशी माझी अपेक्षा आहे. प्रकाश छाब्रिया व मुकुल माधव फाउंडेशन तसेच श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्टच्या दातृत्वाचे बापट यांनी कौतुक केले.

यावेळी अधिष्ठाता डॉ. अजय चंदनवाले म्हणाले, नवजात बालकांना विविध आजारांवर तातडीने उपचार मिळविण्यासाठी अतिदक्षता विभागामध्ये दाखल करावे लागते. उपचारावर होणारा खर्च सर्वसामान्य नागरिकांना परवडणारा नसतो. त्यामुळे अशा आजारांसाठी खासगी तसेच कार्पोरेट रुग्णालयात उपलब्ध असलेल्या सर्व सेवा सुविधा जनतेला उपलब्ध करण्याच्या हेतूने विविध व्यवसायीक कंपन्यांकडून सीएसआर अंतर्गत श्रिदी उपलब्ध करुन घेतला. यामध्ये मुकुल माधव फाउंडेशन (४.२ कोटी), श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्ट(३ कोटी) , कमिन्स इंडिया प्रा.लि.(जनरेटर),सुजलॉन एनर्जी व सिसका एम.ई.बी.प्रा.लि.(मेडिकल गॅस पाईपलाईन), बँक ऑफ बडोदा तसेच राज्य शासनाकडून दोन कोटी रुपये प्राप्त झाले आहेत.